विद्या विकास मंडळ

रामकृष्ण महादेव साळगांवकर उच्च माध्यमिक विद्यालय

मडगांव - गोवा

SECOND TERM EXAMINATION MARCH 2021- 22

इयत्ता : अकरावी विषय : मराठी ( व्दितीय भाषा ) वेळ : १.३० तास

दिनांक : २८ /०३/ २२ गुण : ४०

सूचना : १. प्रत्येक मुख्य प्रश्नाचे उत्तर नव्या पानावर लिहा.
२. प्रश्नांचे क्रमांक स्पष्टपणे लिहा.
३. उजवीकडील अंक प्रश्नांचे गुण दर्शवितात.

प्र.१.अ. खालीलपैकी कोणत्याही एकाचे संदर्भासह स्पष्टिकरण लिहा. (५)

१. "काय करतोस खाली येऊन ? आम्ही खालीच आहोत ना. आमचा काय उपयोग आहे ?"

२. "त्या प्रत्येक फुला - फळाच्या रुपानं आपली स्मृती जिवंत राहील !

प्र.१.ब. खालीलपैकी कोणत्याही एका प्रश्नाचे उत्तर ३ ते ४ ओळीत लिहा. (३)

१. आमटे परिवारात जंगलातील प्राणी कोणत्या एका प्रसंगामुळे सामील होत गेले?

२. कथानायक लहानपणी कोणते उपदव्याप करयचा?

प्र.२.अ. खालीलपैकी कोणत्याही एकाचे संदर्भासह स्पष्टिकरण लिहा. (५)

१.इमारत बनायला वेळ लागत नाही
घर बनायला वेळ लागतो
घरासाठी दोन जीवांचा
खराखुरा मेळ लागतो

२.गोंगाटाने किटतात कान
नसाय होते गर्दीची
गाव हळूच मारतो फुंकर
जात्यावरच्या ओव्यांची

प्र.२.ब. खालीलपैकी कोणत्याही एका प्रश्नाचे उत्तर ७ ते ८ ओळीत लिहा. (४)

१.तो आणि मी यांच्या तुलनेतून कवीने सकारात्मक वृत्तीने जीवन जगण्याचा विचार कसा व्यक्त केला आहे ?

२. शंकर रामाणी यांनी कुळागराचे वर्णन कसे केले आहे ?

प्र.३. खालील वाक्यातील अधोरेखित शब्दांच्या जाती लिहा. (४)

१. मी डोक्यावर हात ठेऊन स्वस्थ बसलो.

२. बापरे ! हत्ती आवेशाने चाल करुन गेला.

३. श्याम हा हुशार मुलगा विद्यार्थी आहे.

४. आज मी फार दुःखी आहे.

प्र.४. खालील शब्दांची भाववाचक नामे लिहा. (३)

१.समान २.व्याकुळ ३.देव

प्र.५. खालील शब्दांची विशेषणे लिहा. (३)

१. चमत्कार २.शास्त्र ३.प्रभाव

प्र.६. खालील शब्दांची विरुध्दार्थी शब्द लिहा. (३)

१.स्पष्ट २.ज्ञान ३.मान

प्र.७. खालील शब्दांची समानार्थी शब्द लिहा. (३)

१.जल २. आकाश ३.मनुष्य

प्र.८. खाली दिलेले वाक्यप्रचार आणि त्याचा अर्थ यांच्या योग्य जोडया लावा. (२)

| अ | आ |
|---|---|
| १. हायसे वाटणे | क. वाईट वाटणे |
| २. मश्गूल होणे | ख. गुंग होणे |
| ३. लक्ष वेधणे | ग. सुटका झाल्यासारखे वाटणे |
| ४. मनाला लावून घेणे | घ. आकर्षित करणे |

प्र.९.रस्त्यावरील वाढते अपघात " या विषयावर दोन मित्र किंवा मैत्रिणीमधील संवाद १० ते १२ ओळीत लिहा. (५)

......... समाप्त ........